बुक-पोस्ट

श्री. / श्रीमती ______________________

______________________

______________________

______________________

अमर हिंद मंडळ
अमरवाडी,
गोखले पथ (उत्तर),
दादर, मुंबई - ४०० ०२८
दूरध्वनी : ४२२ ३५ ८९

फक्त सभासदांसाठी

# अमर हिंद मंडळ, दादर

मुंबई - ४०० ०२८

(स्थापना : १९४७)

(सार्वजनिक विश्वस्त नोंद क्रमांक एफ-४३ (मुंबई)
संस्था विधी नोंद क्रमांक १७८६/२५६ १९४९)

# वार्षिक अहवाल

## १ एप्रिल २००० ते ३१ मार्च २००१

अमरवाडी
गोखले पथ (उत्तर)
दादर, मुंबई - ४०० ०२८
दूरध्वनी : ४२२ ३५ ८९

# अमर हिंद मंडळ, दादर

## १ एप्रिल २००० ते ३१ मार्च २००१

| | | |
|---|---|---|
| विश्वस्त | : | श्री. दिनकर शं. पाटील |
| | | श्री. मुकुंद आ. तिवरेकर |
| | | श्री. एकनाथ ना. साटम |

## १ एप्रिल २००० ते २१ मार्च २००१

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | : | श्री. शंकरराव ना. साळवी |
| उपाध्यक्ष | : | श्री. मधुकर ज. फडके |
| | | श्री. रमेश मा. वरळीकर |
| कार्याध्यक्ष | : | श्री. चिंतामणी वि. नागले |
| कार्योपाध्यक्ष | : | श्री. अरुण अ. देशपांडे |
| कार्यवाह | : | श्री. उमेश व्यं. शेणॉय |
| स. कार्यवाह | : | श्री. सतीश श. रेडीज |
| कोषाध्यक्ष | : | श्री. श्रीकृष्ण शं. राणे |
| सदस्य | : | श्री. दीपक ना. पडते |
| | | श्री. भास्कर भि. केरकर |
| | | श्री. विनोद शं. हडप |
| | | श्री. चारुदत्त शां. थरवल |
| | | श्री. किशोर आ. पालेकर |
| | | सौ. उषा श. मेहता |
| | | श्री. दत्ता अ. सावंत (स्वीकृत) |
| | | श्री. संजय वि. पेडणेकर (स्वीकृत) |

# अमर हिंद मंडळ, दादर

## २१ मार्च २००१ ते ३१ मार्च २००१

अध्यक्ष : श्री. मधुकर ज. फडके

उपाध्यक्ष : श्री. रमेश मा. वरळीकर

श्रीमती उषा श. मेहता

## २४ मार्च २००१ ते ३१ मार्च २००१

कार्याध्यक्ष : श्री. चिंतामणी वि. नागले

कार्योपाध्यक्ष : श्री. अरुण अ. देशपांडे

कार्यवाह : श्री. उमेश व्यं. शेणॉय

स. कार्यवाह : श्री. सतीश श. रेडीज

कोषाध्यक्ष : श्री. श्रीकृष्ण शं. राणे

सदस्य : श्री. दीपक ना. पढते

श्री. भास्कर भि. केरकर

श्री. चारुदत्त शां. थरवल

श्री. दत्ता अ. सावंत

श्री. संजय वि. पेडणेकर

डॉ. स्नेहल मा. बिर्जे

श्री. प्रफुल्ल दा. पाटील (स्वीकृत)

श्री. विजय प्र. राणे (स्वीकृत)

ॲड. विद्या वि. अडसुळे (स्वीकृत)



# अमर हिंद मंडळ, दादर

मुंबई - ४०० ०२८

## वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

अमर हिंद मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. १४ एप्रिल २००२ रोजी सकाळी १०.०० वा. मंडळाच्या सभागृहात संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. मधुकर ज. फडके यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेली आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित राहावे, ही विनंती.

पुढील कामे :-

१. मागील सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.
२. वार्षिक अहवाल (सन २०००-२००१ सालचे) मंजूर करणे.
३. हिशेब व ताळेबंद (सन २०००-२००१ सालचे) मंजूर करणे.
४. हिशेब तपासनीस नेमणे व त्यांचे मानधन ठरविणे.
५. सन २००२ चे अंदाजपत्रक मंजूर करणे.
६ इमारत निधीत व वसंत व्याख्यानमाला निधीत रक्कम वर्ग करण्याबाबतचा ठराव मंजूर करणे.
७. मा. अध्यक्षांच्या परवानगीने सभेपुढे येणाऱ्या अन्य विषयांचा विचार करणे.

दि. १२/३/२००२

कार्यकारी समितीच्या अनुमतीने

उमेश व्यं. शेणॉय

कार्यवाह

सूचना :

१. गणसंख्येच्या अभावी सभा तहकूब झाल्यास घटना-नियमानुसार ही सभा त्याचदिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर होईल.
२. सभासदांना हिशेबासंबंधी माहिती हवी असल्यास ती कार्यालयीन वेळेत (सायंकाळी ६ ते ८ पर्यंत) शनिवार दिनांक ३०/३/२००२ पर्यंत मिळेल.
३. ज्या सभासदांना प्रश्न विचारायचे असतील. त्यांनी ते लेखी स्वरूपात शनिवार दिनांक६/४/२००२ पर्यंत मंडळाच्या कार्यालयात सायंकाळी ६ ते ८ या दरम्यान (रविवार सोडून) आणून द्यावेत.
४. ज्या सभासदांचे पत्ते बदलले असतील त्यांनी त्यांचे बदलेले पत्ते त्वरित कळवावेत. जे सभासद हयात नसतील अशा सभासदांच्या वारसांनी / संबंधितानी मंडळास तद्संबंधीची माहिती त्वरित कळवावी.

# ❁ वार्षिक अहवाल ❁

## दि. १ एप्रिल २००० ते ३१ मार्च २००१

सन्माननीय सभासद बंधुभगिनींनो

सादर वन्दे,

मंडळाच्या कार्याचा वार्षिक अहवाल तसेच जमाखर्च आणि ताळेबंद पत्रके आपणास सादर करताना कार्यकारी समितीस आनंद होत आहे.

या कालावधीत आपल्या बहुमोल सहकार्याने तसेच अनेक हितचिंतकांकडून मिळालेल्या हार्दिक सहयोग आणि आर्थिक पाठबळामुळे मंडळाचे अनेक सामाजिक, शैक्षणिक, क्रीडाविषयक तसेच बहुविध सांस्कृतिक कार्यक्रम यशस्वीरीत्या कार्यवाहीत आणले गेले. या सर्व कार्यक्रमांना चांगलाच प्रतिसाद आणि प्रसिध्दीही लाभली.

मंडळाच्या कार्यकारी समितीने वर्षारंभी खालील भविष्यकालीन योजना डोळयासमोर ठेवलेल्या होत्या.

- मंडळाच्या नवीन वास्तुची बांधकाम योजना कार्यान्वित करण्यासाठी प्रयत्नशील राहाणे. त्यासाठी मंडळाची आर्थिक स्थितीहि मजबूत करणे.
- विविध कार्यक्रमाव्दारे मंडळाच्या नावलौकिक वाढवणे.

बांधकामाच्या कामात अजूनहि काही शासकिय तसेच कुर्ला चर्चकडून काही बाबीसंबंधी कार्यवाही बाकी असल्याने इच्छा असूनहि बांधकाम कामास सुरुवात करता आलेली नाही.

अनेक समाजोपयोगी कार्यक्रम राबवून देखील मंडळाची आर्थिक स्थिती आजही समाधानकारक आहे हे आपणांस जमाखर्च / ताळेबंदपत्रकावरून विदीत होईल. मंडळाने वैविध्यपूर्ण कार्यक्रमांची जी कार्यवाही केली त्यांना वृत्तपत्रे आणि इतर प्रसारमाध्यमव्दारे मिळालेल्या प्रसिध्दीमुळे मंडळाच्या नावलौकिकात निश्चित भर पडली आहे.

मंडळाच्या वार्षिक कार्याचा अहवाल पुढीलप्रमाणे आहे.





**सभा** : वरील कालावधीमध्ये कार्यकारी समितीच्या एकूण ९ सभा झाल्या, कार्यकारी समिती व विश्वस्त यांची १ संयुक्त सभा झाली. (सभा उपस्थितीसाठी परिशिष्ट १ पान पाहा.)

**तहहयात सभासद** : या कालावधीत एकही नवा तहहयात सभासद नोंदविण्यात आला नाही.

**इमारत निधी व वसंत व्याख्यानमाला निधी** : अहवाल काळात रु. ५,००,०००/- (रुपये पाच लाख फक्त) इमारत निधीमध्ये वर्ग करण्यात आले. तसेच रु. ३,००,०००/- (रुपये तीन लाख फक्त) वसंत व्याख्यानमाला निधीत वर्ग करण्यात आले.

**केटरिंग व्यवस्था** : १ जुलै २००० ते ३१ डिसेंबर २००० पर्यंत कामाचे मुल्यमापन करुन पुढील सहा महिन्यासाठी विकी केटरर्स आणि डेकोरेटर्स यांना पूर्ण केटरिंग तसेच डेकोरेशन या दोन्ही बाबींसाठी मुदत वाढ देण्यात आली.

**वसंत व्याख्यानमाला** : मंडळाची ५३ वी वसंत व्याख्यानमाला शुक्रवार दिनांक २१ एप्रिल ते रविवार ३० एप्रिल २००० या दरम्यान आयोजित करण्यात आली होती. या व्याख्यानमालेचे उद्‌घाटन महाराष्ट्र राज्य विधानसभा अध्यक्ष मा. श्री.अरुणभाई गुजराथी यांच्या भारतीय लोकशाहीचे विविध पैलू या विषयावरील व्याख्यानाने झाले. यानंतर विविध विषयांवरील एकूण नऊ व्यासंगपूर्ण व्याख्याने झाली. समारोप ॲड. शेखर नाफडे यांच्या व्याख्यानाने झाला. (अधिक माहितीसाठी परिशिष्ठ २ पान २१ पाहा) पहिल्या दिवसापासूनच व्याख्यानमालेला भरपूर श्रोतृवृंद उपस्थित होता.

## क्रीडा विभाग

प्रतिवर्षी प्रमाणे यंदाही मंडळाचे खोखो व कबड्डी संघ विविध स्तरीय गटांच्या स्पर्धातून खेळले. काही ठिकाणी अंतिम फेरी तर काही ठिकाणी उपांत्य फेरी पर्यंत आपल्या संघानी मजल मारली. सर्वसाधारणपणे खेळाडूंची कामगिरी प्रगतीपथावर आहे.

वर्षभरात उल्लेखनीय कामगिरी पुढील प्रमाणे आहे.

## (अ) सांघिक

खोखो - मंडळाच्या महिला संघाला मुंबई शहर अजिंक्यपद स्पर्धा (२३ ते २८ डिसेंबर २०००) परळच्या विद्यार्थी क्रीडा केंद्र (१८ ते २६ जानेवारी २००१) व शिवसेना शाखा क्र. ६० (१८ ते २० जानेवारी) तर्फे आयोजित केलेल्या मातोश्री चषक जोड - जिल्हा खोखो स्पर्धेत उपविजयीपदे मिळाली.

मुंबई शहर अजिंक्यपद खोखो स्पर्धेत मंडळाच्या ज्युनियर मुली (२० ते २४ ऑक्टोबर २०००) आणि किशोर गट यांना (१५ ते १९ नोव्हेंबर २०००) अनुक्रमे उपविजयीपद व तिसरा क्रमांक मिळाला.

कबड्डी - प्रभादेवी येथील विचार जागृती मंडळातर्फे आयोजित केलेल्या (१०-१०-२०००) ५५ कि. वजनी गटात मुलींच्या संघाला अजिंक्यपद मिळाले याच संघाने मुं. शा. शि. मंडळाचे (१५-२-२००१) अजिंक्यपद निर्विवादपणे मिळवले मु.शा.शि.मंडळ ४० कि. वजनी गटात मुलींच्या संघाला मात्र उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले.

## (ब) वैयक्तिक

खो खो

श्वेता कांबळी - लातूर येथे झालेल्या राष्ट्रीय अजिंक्यपद खो खो स्पर्धेत महाराष्ट्र संघात निवड.

जिल्हा अजिंक्यपद स्पर्धेत मुंबई संघात निवड तसेच सर्वोत्कृष्ट आक्रमक म्हणून निवड.

मिरज येथे झालेल्या राज्य स्पर्धेत अजिंक्य ठरलेल्या मुंबई संघातील सर्वोत्कृष्ट आक्रमक म्हणून निवड.

'पूणे आंतरविद्यापीठीत' खो खो स्पर्धेसाठी (राष्ट्रीय व अश्वमेध) मुंबई संघात निवड.

कविता धुरी - 'मु. शा. शि. मंडळ' ज्युनियर मुली गटात अष्टपैलू खेळाडू म्हणून निवड. विद्यार्थी स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट संरक्षकचे पारितोषिक विजेती.

विशाखा सुर्वे - मातोश्री चषक खो खो स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट आक्रमक पश्चिम विभागीय खोखो स्पर्धा(इंदूर) व फेडरेशन चषक(कलकत्ता) साठी महाराष्ट्र संघात निवड.



सपना कर्पे - महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद खोखो स्पर्धेसाठी ज्युनियर व खुलागट मुंबई संघात निवड. आंतरविद्यापीठ खोखो स्पर्धेसाठी (राष्ट्रीय व अश्वमेध) मुंबई विद्यापीठ संघात निवड.

शितल चोप्रा - आंतरविद्यापीठ खोखो स्पर्धेसाठी (राष्ट्रीय व अश्वमेध) मुंबई विद्यापीठ संघात निवड. तसेच संघाची कर्णधार गणेश गल्ली मित्र मंडळ तर्फे झालेल्या जोड जिल्हा स्पर्धेत उत्कृष्ट संरक्षक म्हणून निवड.

शुभदा धुरी - ज्यु. गट मुंबई संघात निवड आणि याच गटाच्या जिल्हा गटात सर्वोत्कृष्ट संरक्षक. राष्ट्रीय खो खो साठी महाराष्ट्र संघात निवड. हिंद करंडक स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट अष्टपैलू.

अस्मिता मुतालिक - ज्यु. मुंबई संघात निवड

गीता तुळसकर : मुंबई जिल्हा किशोरी गटात निवड

प्रसाद कांबळी - हिंद करंडक स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट अष्टपैलू

रोहन चव्हाण - मुंबई जिल्हा किशोर गटात निवड.
मुं. शा. शि. मं. आयोजित खो खो स्पर्धेतील किशोर गटातील सर्वोत्कृष्ट आक्रमक.

अमित संत - मु. शा. शि. मंडळ आयोजित खो खो स्पर्धेतील किशोर गटातील सर्वोत्कृष्ट आक्रमक.

### कबड्डी -

शारदा भोगले - आंतर विद्यापीठ (अश्वमेध मुंबई विद्यापीठ) संघात निवड.
मावळी मंडळ ठाणे राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेतील दिवसाची मानकरी.

आरती नार्वेकर - राज्य स्पर्धेसाठी मुंबई ज्युनियर संघात निवड.
विचार जागृती मंडळाच्या स्पर्धेत सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून गौरव.

अलका पारकर - विचार जागृती मंडळाच्या स्पर्धेत अष्टपैलू खेळांडूचे पारितोषिक.

भारती चव्हाण - अखिल भारतीय कबड्डी स्पर्धेसाठी (नाशिक) महाराष्ट्र संघातून निवड. महिला क्रीडा स्पर्धेसाठी मुंबई संघात निवड.

मधुरा मोरे व अक्षया खेडकर - राज्य अजिंक्यपद स्पर्धेसाठी मुंबई किशोरी गटात निवड.

राहलू वडेकर - राज्य अजिंक्यपद मुंबई ज्यु. संघात निवड.

साईनाथ काळशेकर - मुंबई राज्य अजिंक्यपद स्पर्धेसाठी मुंबई किशोर गटात निवड.

दैनंदिन सराव - खो खो (पुरुष, मुले)- श्री. रमेश नाटेकर, खो खो (महिला, मुली)- श्री. प्रफुल्ल (बाळा) पाटील, कबड्डी (पुरुष, मुले) कबड्डी (महिला, मुली)- श्री. विजय राणे हे सराव घेत असतात. आवश्यक तेव्हा श्री. रमेश वरळीकर खोखो साठी मार्गदर्शन करतात. प्रत्येक गटातील जेष्ठ खेळाडू प्रमुख प्रशिक्षकांच्या गैरहजेरीत सराव घेत असतात.

सुमारे १०० खेळाडू पटावर आहेत खाजगी शिकवणी वर्ग शाळा / कॉलेज यांची वेळ आणि सरावाची वेळ यांचा मेळ जुळविणे दिवसेंदिवस अवघड होत आहे. तरी सुद्धा प्रशिक्षक व खेळाडू भरपूर श्रम घेत असतात.

इतर : खेळाडू गौरव : १५ ऑगस्ट २००१ स्वातंत्र्य दिनी हुशार खेळाडूंचा भेटवस्तू देऊन मंडळातर्फे गुणगौरव करण्यात आला. वार्षिक परिक्षेत किमान ६० टक्के गुण व सरावाची दैनंदिन उपस्थिती लक्षात घेऊन यंदा खेळाडूचे कौतूक करण्यात आले. अभ्यास व खेळ दोन्हीतील प्रगती उत्तम असावी अशी अपेक्षा खेळाडूंकडून आहे. या कल्पनेचे अनेकांनी स्वागत केले. प्रतिवर्षी अशा हुशार खेळाडूंची संख्या वाढत राहावी ही. सदिच्छा!

## अभिनंदनीय

उमेश शेणॉय : सिडनी ऑलिपिंकचाच भाग असलेल्या "ऑलिपिंक फिलोटेलीक एक्झिबिशन" मध्ये उमेश शेणॉय यांच्या ऑलिपिंक "ओरीजन टू सेटींनरी" या पुस्तकाला रौप्य-पदक तर त्यांच्या वरील विषयावरील टपाल तिकीट संग्रहास रौप्य कास्य पदक मिळाले.

कलकत्ता येथे जाने २००१ मध्ये "आशियाई स्तरावरील फिलोटेलिक" स्पर्धेत वरील पुस्तकाला परत रौप्य पदक देण्यात आले.

रमेश वरळीकर - "खो खो" व खो खो सांख्यिकी साखळीतून हि पुस्तके प्रसिद्ध झाली ही अनुक्रमे "ग्रंथाली महाराष्ट्र खो खो" असो. ने प्रकाशित केली.

जतिन टाकळे : राज्य खो खो पंच परिक्षा उत्तीर्ण.

श्वेता कांबळी व कविता धुरी : यांना सिंधुदुर्ग जिल्हा तर्फे प्रतिवर्षी दिली जाणारी सुभद्राबाई शिक्षण निधी या संस्थेची क्रीडा शिष्यवृत्ती मिळाली.



श्रीमती उषा मेहता यांच्या 'अग्रुप' या काव्यसंग्रहालय महाराष्ट्र शासनाचा विशेष साहित्य पुरस्कार मिळाला. (ऑगस्ट २०००)

श्री. शंकरराव तथा बुवा साळवी यांची महाराष्ट्र राज्य कबड्डी संघटनेच्या सरचिटणीसपदी बिनविरोध फेरनिवड झाली.

मुंबई खो खो संघटनेच्या कार्यकारिणीवर बिनविरोध निवड.

श्री. उदयदादा लाड - अध्यक्ष
श्री. मनोहर साळवी - सरचिटणीस
श्री. तुषार सुर्वे - खजिनदार
श्री. संजीव ठाकूर देसाई - सदस्य

श्री. उदय देशपांडे

महाराष्ट्र मल्लखांब संघटनेवर प्रमुख संघटक म्हणून नियुक्ती.

इतर

मिरज येथे झालेल्या (खुला गट) राज्य अजिंक्यपद खों खो स्पर्धेत अजिंक्यपद मिळविलेल्या मुंबईच्या पुरुष व महिला संघाचा मंडळातर्फे दि. २० जानेवारी २००१ रोजी सत्कार करण्यात आला. या वेळी मुंबई खो खो संघटनेचे अध्यक्ष श्री. उदयदादा लाड व कार्यकारिणीचे इतर सदस्य सहभागी झाले होते.

वर्षा सहल - यंदा माळेशत घाट येथे वर्षा सहल आयोजित करण्यात आली. यात खेळाडूं व कार्यकर्ते यांनी सहभाग घेतला सहल उत्तमपणे पार पडली.

इतर कार्यक्रम - भारतीय स्वातंत्र्याचा ५३ वा वर्धापनदिन मंगळवार दिनांक १५ ऑगस्ट २००० रोजी भावगीताच्या व चित्रपट संगीताच्या चंदेरी दुनियेतील श्रेष्ठ संगीतकार माननीय श्री. सुधीर फडके यांच्या हस्ते ध्वजारोहण करुन साजर करण्यात [illegible]ला.

सुप्रसिद्ध निसर्गोपचार महर्षी डॉ. जयनारायण जयस्वाल व मंडळ यांनी संयुक्तपणे 'निसर्गोपचार व आपले आरोग्य ' या विषयावरील ५ दिवसांचे शिबीर मंगळवार दि. १४ नोव्हेंबर २००० ते शनिवार दि. १८ नोव्हेंबर २००० या कालावधीत अमर हिंद मंडळाच्या सभागृहात आयोजित केले. सदर शिबीरात डॉ. जयनारायण जयस्वाल यांची निसर्गोपचारावर मार्गदर्शनपर व्याख्याने झाली. डॉ. (सौ.) प्रीती ठाकूर व डॉ. सौ. लता फडके यांनीही या कार्यक्रमात सहभाग नोंदवला. या कार्यक्रमास चांगला प्रतिसाद लाभला.

भारताचा प्रजासत्ताकदिन दिनांक २६ जानेवारी २००१ रोजी सकाळी मंडळाच्या पटांगणात जेष्ठ व श्रेष्ठ सामाजिक कार्यकर्त्या सन्माननीय श्रीमती मनुताई फडके यांच्या शुभहस्ते ध्वजवंदन करुन साजरा करण्यात आला.

सायंकाळी मंडळाच्या ५४ व्या वर्धापनदिनानिमित्त मंडळाचे सभासद कार्यकर्ते, हितचिंतक, आश्रयदाते, आजीमाजी खेळाडूं आणि कलावंत यांचे स्नेहसंमेलन आयोजित करण्यात आले. या प्रसंगी 'श्रीवरदविनायक' निर्मित नाटक 'तू तू, मी मी' सादर करण्यात आले या कार्यक्रमास प्रेक्षकांचा उत्तम प्रतिसाद लाभला.

अमर हिंद मंडळाच्या घटनेप्रमाणे दि. २१ फ्रेबुवारी २००१ रोजी पुढील तीन वर्षासाठी अध्यक्ष, दोन उपाध्यक्ष आणि कार्यकारी समितीच्या ११ सभासंदाच्या निवडणूकीचा कार्यक्रम पार पाडण्यात आला. कार्यकारी समितीने निवडणूकीसाठी निवडणूक अधिकारी म्हणून डॉ. अनिल वाकणकर यांची नेमणूक केली होती.

या निवडणूकीत खालील सभासंदाची निवड झाली तर अध्यक्ष आणि दोन उपाध्यक्ष हे बिन-विरोध निवडून आले.

अध्यक्ष - श्री. फडके मधुकर जनार्दन.

उपाध्यक्ष - श्री. वरळीकर रमेश माधवराव, श्रीमती मेहता उषा शशिकांत

<u>कार्यकारी समितीचे सभासद</u>

श्री. शेणॉय उमेश व्यंकटराव
श्री. देशपांडे अरुण अनंत
श्री. रेडीज सतीश शरच्चंद्र
श्री. राणे श्रीकृष्ण शंकर
श्री. नागले चिंतामणी विश्वानाथ
श्री. थरवल चारुदत्त शांताराम
श्री. केरकर भास्कर भिवा
श्री. पडते दीपक नारायण
श्री. सावंत दत्ता अनंत
डॉ. बिर्जे स्नेहल माधव
श्री. पेडणेकर संजय विठ्ठल

यानंतर निर्वाचित सभासदांमधून दि. २४-२-२००१ रोजी झालेल्या जुन्या-नव्या कार्यकारी समितीच्या बैठकीमध्ये खालील नवीन कार्यकारी समितीचे पदाधिकारी निवडण्यात आली.



कार्याध्यक्ष : श्री. नागले चिंतामणी विश्वानाथ
कार्योपाध्यक्ष: श्री. देशपांडे अरुण अनंत
कार्यवाह - श्री. शेणॉय उमेश व्यंकटराव
स. ~~कोषाध्यक्ष~~ कार्यवाह - श्री. रेडीज सतीश शरच्चंद्र
कोषाध्यक्ष - श्री. राणे श्रीकृष्ण शंकर

श्री. प्रफुल्ल पाटील, श्री. विजय राणे व सौ. ॲड. विद्या वि. अडसुळे अनुक्रमे यांना दि. २४/२/२००१ रोजी कार्यकारी समितीकडून स्वीकृत सभासद म्हणून निवडण्यात आले.

गुरुवार दिनांक ८ मार्च २००१ रोजी अमर हिंद मंडळाच्या सभागृहात आंतर राष्ट्रीय महिला दिनानिमित्त ''चीन आणि चीनमधील स्त्रिया'' या विषयावर ''माझे लंडन डायना आणि चार्ल्स व दक्षिण रंग '' या गाजलेल्या पुस्तकांच्या लेखिका डॉ. मीना प्रभु यांचे व्याख्यान आयोजित केले होते. यावेळी डॉ. प्रभु यांनी आपल्या विषयाच्या अनुषंगाने काही स्लाईडसही दाखवल्या या कार्यक्रमास प्रेक्षकांचा उत्तम प्रतिसाद लाभला.

**संकीर्ण**

- अहवाल काळात मंडळाने नवीन २०० प्लास्टीक खुर्च्या खरेदी केल्या
- मंडळातर्फे प्रतिवर्षप्रमाणे दिवाळी भेटकार्डे, सभासद, खेळाडू, हिचचिंतक व इतर मान्यवरांना पाठविण्यात आली.
- अहवाल काळात सभागृहातील रसोडयाची दुरुस्ती करुन पाण्याची नवीन टाकी बसवण्यात आली.
- सभागृहाची तात्पुरती रंग रंगोटी करण्यात आली.

## श्रद्धांजली

मंडळाचे तहहयात सभासद आणि माजी अध्यक्ष बॅ. विठ्ठलराव गाडगील व मंडळाचे तहहयात सभासद श्री. कुंजविहारी वगळ यांचे अहवालकाळात निधन झाले मंडळाची त्यांना साश्रुपूर्ण श्रद्धांजली.

## कार्यकारी समितीच्या सभा उपस्थितीची माहिती
## (परिशिष्ट १)

| | २०००-२००१ |
|---|---|
| १) श्री. चिंतामणी वि. नागले (कार्याध्यक्ष) | ८ |
| २) श्री. अरुण अ. देशपांडे (कार्योपाध्यक्ष) | ८ |
| ३) श्री. उमेश व्यं. शेणॉय (कार्यवाह) | ८ |
| ४) श्री. सतीश श. रेडीज (सं. कार्यवाह) | ८ |
| ५) श्री. श्रीकृष्ण शं. राणे (कोषाध्यक्ष) | ९ |
| ६) श्री. दीपक ना. पडते (सदस्य) | ३ |
| ७) श्री. भास्कर भिंवा केरकर (सदस्य) | ८ |
| ८) श्री. विनोद शं. हडप (सदस्य) | - |
| ९) श्री. चारुदत्त शां. थरवल (सदस्य) | ६ |
| १०) श्री. किशोर आ. पालेकर (सदस्य) | २ |
| ११) सौ. उषा श. मेहता (सदस्य) | १ |
| १२) श्री. दत्ता अ. सावंत (सदस्य) | ३ |
| १३) श्री. संजय वि. पेडणेकर (सदस्य) | ९ |
| १४) डॉ. स्नेहल मं. बिर्जे (सदस्य) (दि. २४-२-२००१ पासून) | १ |
| १५) श्री. प्रफुल्ल दा. पाटील (सदस्य) (दिनांक ९-२-२००१ पासून) | १ |
| १६) श्री. विजय प्र. राणे (सदस्य) | १ |
| १७) सौ. विद्या वि. अडसूळे (सदस्य) | - |



परिशिष्ट (२)

# वसंत व्याख्यानमाला (वर्ष ५३ वे)

## कार्यक्रम पत्रिका

शुक्रवार : दि. २१-४-२०००
उद्‌घाटक - श्री. अरुणभाई गुजराथी, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य विधानसभा
विषय : *भारतीय लोकशाहीचे विविध पैलू*

शनिवार : दि. २२-४-२०००
वक्ते - श्री. अच्युत गोडबोले
विषय : *२१ वे शतक आणि संगणक युग*

रविवार : दि. २३-४-२०००
वक्ते - डॉ. चंद्रकान्त वर्तक
विषय - *प्रवासवर्णन एक साहित्य प्रकार*

सोमवार : दि. २४-४-२०००
वक्ते - डॉ. नरेन्द्र दाभोळकर
विषय : *देव, धर्म आणि अंधश्रद्धा निर्मूलन*

मंगळवार : दि. २५-४-२०००
वक्ते - डॉ. नीला पाटील
विषय : *माणसे अशी का वागतात?*

बुधवार : दि. २६-४-२०००
वक्ते - व्यंगचित्रकार व हास्यचित्रकार श्री. विवेक म्हात्रे
विषय - *इंटरनेटची धमाल*

गुरुवार : दि. २७-४-२०००
वक्ते - श्री. निनाद बेडेकर
विषय - *अपरिचित शिवाजी*

शुक्रवार : दि. २८-४-२०००
वक्ते - प्रा. हेमचंद प्रधान
विषय - विद्यार्थ्यांसाठी नविन क्षितिजे आंतरराष्ट्रीय स्पर्धा

शनिवार : दि. २९-४-२०००
विषय - *मालिका स्त्री-पुरुष संबंधाच्या*

रविवार : दि. ३०-४-२०००
वक्ते - ॲड. शेखर नाफडे
विषय - *नवा भाडे नियंत्रण कायदा*